दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शुक्रवार दि.२१ नोव्हेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ९१ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Friday 21 Nov 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 91 | Pages 4 | Rate 4 Rs


## अनेक शहरांत तापमान १० अंशांखाली

**मुंबई–** राज्यात गेल्या काही दिवसांपासून थंडीने चांगलाच जोर धरला असून किमान तापमानात मोठी घसरण नोंदवली जात आहे. उत्तर भारतातून येणाऱ्या थंड वाऱ्यांचा फटका महाराष्ट्राला बसत असून सध्या अनेक जिल्ह्यांमध्ये सकाळच्या आणि रात्रीच्या वेळी बोचरी थंडी जाणवत आहे. मात्र भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार आता पुढील चार ते पाच दिवसांत तापमानात किंचित वाढ होऊ शकते. त्यामुळे २ ते ४ अंशांनी किमान तापमान वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. अचानक वाढलेल्या थंडीमुळे नागरिक त्रस्त झाले असताना हा अंदाज काही प्रमाणात दिलासा देणारा मानला जात आहे.

# तक्रारींचा पाढा वाचणारा एकनाथ शिंदे नाही:छोट्या मोठ्या तक्रारी आम्ही राष्ट्रीय पातळीवर आणत नाही

## केंद्रीय गृहमंत्री अमित शहांच्या भेटीनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे स्पष्टीकरण

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)–उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी आज अचानक दिल्लीला भेट देत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या राज्यातील नेत्यांविषयीची आपली नाराजी अमित शहांना कथन केल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. उभय नेत्यांमध्ये सुमारे ५० मिनिटे चर्चा झाल्याचे समजते आहे. त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी स्वत: पत्रकारांशी संवाद साधला असून भेटी संदर्भात माहिती दिली आहे.एकनाथ शिंदे म्हणाले, दिल्लीमधून बिहारला आता मी निघणार आहे. त्यामुळे मी बिहारच्या यशाचे अभिनंदन करण्यासाठी गृहमंत्री अमित शहा यांना भेटलो. चांगली चर्चा त्यांच्यासोबत झाली. बिहारमध्ये दैदीप्यमान यश मिळाले आहे त्यामुळे जाताजाता त्यांना शुभेच्छा देण्यासाठी भेटलो, असे शिंदे यांनी म्हटले आहे.**

शिवसेना शिंदे गटाच्या मंत्र्यांनी बैठकीवर बहिष्कार टाकला आणि त्यानंतर तुम्ही अमित शहा यांना भेटला, यावर प्रतिक्रिया देताना एकनाथ शिंदे म्हणाले, हे सगळे तुमचे कल्पना विलास आहे, हे तुम्ही पतंग उडवत असता. आतमध्ये मी बसलो आहे आणि बाहेर तुमच्या बातम्या सुरू आहेत. मी एवढे सांगतो की ज्या नगरपालिका किंवा स्थानिक स्वराज्याचे जे काही प्रश्न आहेत हे राष्ट्रीय पातळीवर आणण्याचा काही विषयच नसतो. त्यामुळे आम्ही काल मुख्यमंत्र्यांसोबत बसलो, चर्चा केली. त्यातून एवढेच ठरले की महायुतीला कुठेही गालबोट लागणार नाही, कुठेही मतभेद होणार नाही याची काळजी प्रत्येक पक्षाने घेतली पाहिजे, अशा प्रकारच्या सूचना देण्यात आल्या. त्यामुळे हा विषय संपला आहे. हा विषय इथे दिल्लीत नव्हताच मुळात.

रवींद्र चव्हाण यांच्याकडून वेळोवेळी शिवसेनेच्या नेत्यांना आव्हान देण्याचा प्रयत्न केला जातो, यावर काय म्हणाल? असा प्रश्न विचारला असता एकनाथ शिंदे म्हणाले, याबाबतीत त्यांचे जे काही पक्ष श्रेष्ठी आहेत ते निर्णय घेतील. आणि हा विषय काल संपला आहे. त्या विषयाला मी गांभीर्याने घेत नाही. मुख्यमंत्री भाजपचे नेते आहेत आणि मी शिवसेनेचा नेता आहे आम्ही आमच्या नेत्यांना सूचना देण्याचे काम केले आहे. महायुती मजबुतीने निवडणुकांना सामोरे जात आहे. स्थानिक स्वराज्य निवडणुकांमध्ये सुद्धा चांगले यश मिळणार आहे, असा विश्वास शिंदे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला आहे.



### रडणारा एकनाथ शिंदे नाही

**महाराष्ट्रात एनडीए आपापसात भांडताना दिसत आहे याची तक्रार करण्यासाठी अमित शहा यांची भेट घेतली का? असा प्रश्न एकनाथ शिंदे यांना विचारला असता शिंदे म्हणाले, तक्रारींचा पाढा वाचणारा, रडणारा एकनाथ शिंदे नाही. हा रडणारा नाही लढणारा आहे आणि आपण ते पाहिले आहे वेळोवेळी. या छोट्या मोठ्या तक्रारी आम्ही राष्ट्रीय पातळीवर आणत नसतो आणि खरे म्हणजे बिहारमध्ये एनडीएमध्ये पाच पक्ष एकत्र होते त्यामुळे तिथे मोठे यश मिळाले. तसेच बिहारच्या जनतेला पूर्वीचे जंगलराज नको होते, विकास राज पाहिजे होते. महाराष्ट्रात देखील विधानसभेच्या निवडणुकीत आपण बघितले की एकजुटीचे बळ काय असते आणि जनतेने महायुतीला यश मिळाले.**

# शेतकऱ्यांसाठी 'देवदूत' ठरली नंदुरबारची एस.टी.समिती एक दिवसाचे वेतन दिले मुख्यमंत्री सहाय्यता निधीला

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**



राज्यातील पूरग्रस्त शेतकरी बांधवांना तातडीची मदत मिळावी या उदात्त सामाजिक जाणिवेतून, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नंदुरबार (सहआयुक्त तथा उपाध्यक्ष यांच्या नेतृत्वाखाली) यांनी एक अत्यंत स्तुत्य आणि प्रेरणादायी पाऊल उचलले आहे. समितीच्या सर्व कर्मचारी वर्गाने त्यांचे एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी जमा करून सामाजिक उत्तरदायित्वाची एक नवी मिसाल कायम केली आहे.या संवेदनशीलता आणि बांधिलकीच्या भावनेतून, समितीने एकूण ४१,३९०/- (एकेचाळीस हजार तीनशे नव्वद रुपये) मूल्याचे तीन धनादेश तयार केले.

शेतकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी हा मदतीचा हातभार तातडीने उपलब्ध व्हावा म्हणून दिनांक १८ रोजी नंदुरबार येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडे हे धनादेश अधिकृतरीत्या सुपूर्द करण्यात आले. धनादेश स्वीकारताना मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे वैद्यकीय अधिकारी, समाजसेवा अधीक्षक, कनिष्ठ लिपिक व वैद्यकीय समन्वयक यांनी समितीचे आणि कर्मचारी वर्गाचे मन:पूर्वक आभार मानले. नैसर्गिक संकटांमध्ये शेतकरी बांधवांना आधार देण्यासाठी प्रशासन, कर्मचारी आणि समाज यांनी एकत्र येऊन कार्य करण्याची नितांत गरज आहे. समितीच्या या कृतीतून जिल्ह्याची सामाजिक एकजूट अधिक मजबूत झाली असून, संकटांचा सामना एकत्रित प्रयत्नांतूनच अधिक परिणामकारकपणे करता येतो, असा प्रेरणादायी संदेश दृग्गोचर झाला आहे.जिल्हा प्रशासनाने या योगदानाचे कौतुक केले असून, सर्व नागरिक आणि संस्थांना आवाहन केले आहे की, संकटग्रस्त कुटुंबांना मदतीचा हात पुढे करावा.

### अवैध वाळू उत्खननावर जिल्हाधिकाऱ्यांचा 'सर्जिकल स्ट्राइक'

# ८ घाटांना नियमानुसार लिलाव संयुक्त पथके करणार कडक तपासणी!

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हास्तरीय वाळू/रेती संनियंत्रण समितीच्या बैठकीत नंदुरबार जिल्ह्यातील वाळू व्यवस्थापनाबाबत अत्यंत महत्त्वाचे आणि कठोर निर्णय घेण्यात आले आहेत. या निर्णयामुळे वाळू उपसा अधिक पारदर्शक, नियोजित आणि कडक कायदेशीर चौकटीत होणार आहे.बैठकीत जिल्ह्यातील ०८ वाळू घाटांच्या प्रस्तावांना तत्त्वतः मंजुरी देण्यात आली आहे. या घाटांवर आता आवश्यक खाणकाम आराखडा तयार केला जाईल आणि त्यानुसार पर्यावरणीय मंजुरी मिळवून लिलाव प्रक्रिया सुरू करण्यात येईल.

हा नियोजित खाणकाम आराखडा वाळू उपसा



नियंत्रित ठेवेल आणि पर्यावरणाचे नियम काटेकोरपणे पाळले जातील याची खात्री देईल.

जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीच्या तक्रारींवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी महसूल, पोलीस आणि परिवहन विभागांना कठोर निर्देश दिले आहेत. या तीन विभागांची संयुक्त पथके तयार करण्यात येतील.या पथकांनी जिल्ह्यात सतत वाहन तपासणी मोहीम राबवून अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांवर करडी नजर ठेवावी. अवैधता आढळल्यास तत्काळ दंडात्मक कारवाई करावी, अशा स्पष्ट सूचना डॉ. सेठी यांनी दिल्या आहेत.

या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपजिल्हाधिकारी (महसूल), सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंते, पाटबंधारे विभागाचे अधिकारी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, वरिष्ठ भूवैज्ञानिक आणि जिल्हा खनिकर्म अधिकारी यांच्यासह पोलीस विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.नंदुरबार जिल्ह्यातील वाळू व्यवस्थापन शिस्तबद्ध, कायदेशीर आणि जनहिताचे होण्यासाठी प्रशासन व सर्व विभाग एकत्रितपणे कार्यरत राहतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# नंदुरबारच्या संतोष पावरा यांच्या 'आदिवासी पहचान' पुस्तकाचे झारखंडमध्ये प्रकाशन आदिवासी साहित्य संवर्धनात महत्त्वाचे पाऊल!



दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्यातील सुप्रसिद्ध आदिवासी युवा कवी व साहित्यिक संतोष पावरा यांच्या 'आदिवासी पहचान' या महत्त्वपूर्ण पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच झारखंड येथे प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडले.

संतोष पावरा हे त्यांच्या मूळ पावरा बोलीभाषेसोबतच भिली मराठी आणि हिंदी भाषेतही विपुल लेखन करतात. त्यांच्या साहित्याची दखल राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली असून, त्यांना अनेक राज्य आणि राष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, येथील अभ्यासक्रमात त्यांची 'कुपोषण' ही कविता समाविष्ट आहे.आदिवासी पावरा आणि भिल्ल बोलीभाषा संवर्धनासाठी संतोष पावरा यांना टाटा स्टील फाऊंडेशन, जमशेदपूर, झारखंड कडून प्रतिष्ठित संवाद फेलोशिप मिळाली होती. याच फेलोशिप अंतर्गत त्यांनी 'आदिम अस्तित्व के स्वर' आणि आता 'आदिवासी पहचान' ही दोन महत्त्वाची पुस्तके लिहिली आहेत. या पुस्तक प्रकाशन सोहळ्याला विविध क्षेत्रांतील दिग्गजांनी हजेरी लावली होती. आदिवासी अकॅडमी व भाषा संशोधन केंद्र, बडोदाचे संचालक डॉक्टर मदन मीना, डॉक्टर सोनम वांगचुक, टाटा समूहाचे उपाध्यक्ष सुंदरा रामन, फिल्म डायरेक्टर ओयमन डोरेन, सौरभ रॉय आणि जिरेन टोपनो आदी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.यावेळी आपले मत व्यक्त करताना कवी संतोष पावरा यांनी स्पष्ट केले की, आदिवासी अस्तित्व जपायचे असेल, तर त्यापूर्वी आदिवासी मौखिक साहित्य संकलन करणे अत्यंत आवश्यक आहे. या कार्यासाठी त्यांना संवाद फेलोशिप टीमच्या अंशू मॅडम, प्रफुल बोधरा, शालिनी कुजूर, श्वेता मॅडम यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# नैसर्गिक आपत्तीत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाचे ५३.९९ लाखांचे अनुदान; ई-केवायसी तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्यात सप्टेंबर २०२५ महिन्यात नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या पिकांच्या मोठ्या नुकसानीनंतर शासनाने तातडीची मदत म्हणून ५३,९९,०००/- रुपये (रुपये त्रेपन्न लाख नव्याण्णव हजार मात्र) इतक्या अनुदानाची तरतूद करून ती डीबीटी प्रणालीद्वारे उपलब्ध करून दिली आहे. एकूण ९१८ शेतकऱ्यांचे पिकांचे नुकसान नोंदवले गेले असून, त्यापैकी ६०३ शेतकऱ्यांना ३६,८५,१२०/- रुपये (रुपये छत्तीस लाख पंच्याऐंशी हजार एकशे वीस मात्र) अनुदान वितरित करण्यात आले आहे. शिल्लक ३१५ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी आपले ई-केवायसी पूर्ण केल्यास त्यांचे अनुदान तात्काळ खात्यात जमा होणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशा संघवी यांनी दिली.

तालुकानिहाय मदत वाटपात अक्कलकुवा तालुक्यात १४८ शेतकऱ्यांना १,१९,८५० रुपये (रुपये एक लाख एकोणीस हजार आठशे पन्नास) वितरित झाले असून ८७ शेतकऱ्यांचे ई-केवायसी बाकी आहे. अक्राणीमध्ये ९८ शेतकऱ्यांना ४७,१७५ रुपये (रुपये सत्तेचाळीस हजार एकशे पंचाहत्तर) वाटप झाले असून ९४ ई-केवायसी प्रलंबित आहेत. नंदुरबार तालुक्यात २७० शेतकऱ्यांना १७,४२,२७० रुपये (रुपये सतरा लाख बेचाळीस हजार दोनशे सत्तर) मिळाले असून ५४ अद्यापही शेतकऱ्यांनी ई-केवायसी करणे आवश्यक आहे. नवापूरमध्ये १७२ शेतकऱ्यांना ४,४६,०८० रुपये (रुपये चार लाख छेचाळीस हजार ऐंशी) अनुदान मिळाले असून ४० जणांचे ई-केवायसी अद्याप अपूर्ण आहे. शहादा तालुक्यात ७७ शेतकऱ्यांना ३,५१,८७० रुपये (रुपये तीन लाख एकावन्न हजार आठशे सत्तर) तर तळोदा तालुक्यात १५३ शेतकऱ्यांना ९,७७,८७५ रुपये (रुपये नऊ लाख सत्याहत्तर हजार आठशे पंच्याहत्तर) मदत वितरित झाली असून अनुक्रमे २१ व १९ शेतकऱ्यांचे ई-केवायसी बाकी आहे.

जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी आपल्या ऍग्रीस्टॅक नोंदणी शक्य तितक्या लवकर पूर्ण करावी. आगामी काळात ई-पंचनामा पद्धत लागू होणार असल्याने ऍग्रीस्टॅक नोंदणी सर्व खातेधारक शेतकऱ्यांसाठी अत्यावश्यक ठरणार आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी नोंदणी करून शासनाच्या आपत्ती मदत प्रक्रियेला सहकार्य करावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशा संघवी यांनी केले आहे.

# साने गुरुजी निवासी विद्यालयात चित्रकला एलिमेंटरी व इंटरमिजिएट ग्रेड परीक्षा सुरळीत चालू

दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

दि.१८ नोव्हेंबर २०२५ रोजी बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज संचलित साने गुरुजी निवासी विद्यालया मध्ये केज तालुक्यातील एलिमेंटरी व इंटरमिजिएट चित्रकला परीक्षेत प्रविष्ट सर्व शाळेतील एकूण १८० विद्यार्थ्यांची परीक्षा दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ ते २१ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत संपन्न होत आहेत.सन २०२४-२५ पासून केज तालुक्याला साने गुरुजी विद्यालयात सह केंद्र म्हणून मान्यता मिळालेली आहे.त्यामुळे केज तालुक्यातील विद्यार्थी शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.तसेच सह केंद्र दिल्याबद्दल धारूर केंद्राचे श्री आकुसकर सर यांचे सर्व केज वासीयांनी आभार मानले आहेत. सदर परीक्षेची स्वतंत्र ०४ हॉल मध्ये व्यवस्था करण्यात आली आहे.या परिक्षेची पूर्वतयारी व्यवस्थीत करण्यात आली असून साने गुरुजी निवासी विद्यालयातील कर्मचारी सुरळीतपणे परिक्षा घेत असल्याने समाधान व्यक्त करण्यात येत आहे.



संपादकीय

# काँग्रेसची मनधरणी

निवडणुका जाहीर होईपर्यंत नकली डरकाळ्या फोडणाऱ्या उबाठाला प्रत्यक्ष मैदान दिसू लागताच कसा घाम फुटला आहे, हे गेल्या दोन-चार दिवसांतल्या त्यांच्या प्रयत्नांतून, त्यांच्या मुखपत्रांच्या माध्यमांतून दिसू लागलं आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत आपलं पुरतं वस्त्रहरण होणार हे ओळखून त्यांनी पूर्वीच मोठ्या प्रयासाने मनसेला मनवलं आणि आपल्याबरोबर घेतलं. मनसेसोबत येताच यांनी यांच्याच बाजूने दर दोन दिवसांनी एकीची ग्वाही द्यायला सुरुवात केली. 'आम्ही एकत्र आलो आहोत, ते एकत्र राहण्यासाठीच', हे पालुपद दोन-चार कार्यक्रमांत लावून त्यांनी उरल्यासुरल्या शिवसैनिकांना रोखण्याचे प्रयत्न केले. बेजान नेतृत्वामुळे हिंमत हरलेल्या शिवसैनिकांना शिवसेनेच्या उंबऱ्याआड रोखण्याचा तो प्रयत्नही फारसा यशस्वी झाला नाही. त्यामुळे, दिवाळीचं निमित्त साधून कौटुंबिक स्नेहसंमेलनाचे देखावे करण्यात आले. कोणतीही दुरावलेली कुटुंबं एक होत असतील, तर ती चांगलीच गोष्ट आहे. पण, तुमची कुटुंबं म्हणजेच तुमचे पक्ष नव्हेत. सैनिकांच्या कुटुंबांचा विचार कोणी करायचा? संपूर्ण पक्ष म्हणजेच कुटुंब असण्याचे वंदनीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाचे दिवस कधीच सरले. आता शिवसैनिकाला पोरकं करून, त्याला झिडकारून 'माझे कुटुंब हीच माझी जबाबदारी'चे दिवस सुरू झाल्याने उबाठाच्या ताकदीला इतकी उतरती कळा लागली आहे, की प्रत्येक निवडणुकीत त्यांचं अधिकाधिक वस्त्रहरण होत चाललं आहे. येत्या मुंबई, ठाणे, कल्याण, भिवंडी, विरार, नवी मुंबई या महामुंबईतल्या महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी निवडणूक लढवतील असे उमेदवारही त्यांना मिळायला तयार नाहीत, अशी परिस्थिती झाल्यानंतर आता 'महाविकास आघाडी'चं कातडं पांघरून त्याआड लाज झाकण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. काँग्रेसने स्वतंत्र निवडणूक न लढवता 'आघाडी'त राहावं आणि 'आघाडी' म्हणूनच निवडणूक लढवावी, यासाठी विविध मार्गांनी वेगवेगळे युक्तिवाद केले जात आहेत.उबाठाची ही केविलवाणी स्थिती व्हायला जबाबदार तेच आहेत. ते आणि त्यांच्या प्रवक्त्यांची मुद्दाम वक्तव्यं. मनसेला सोबत आणण्याचं मिशन मोठ्या प्रयासाने यशस्वी केल्यानंतर जणू 'घोडं गंगेत न्हालं' या आनंदात त्यांनी आघाडीतल्या इतर पक्षांच्या दिशेने लाथा झाडायला सुरुवात केली. उबाठाच्या प्रवक्त्यांनी तर जुलै महिन्यात सातत्याने 'महाराष्ट्रात आता आघाडीची गरज राहिलेली नाही', 'मनसे आणि उबाठा सोबत असतीलच. इतरांनी आपापल्या भूमिकांचा विचार करावा' यासारखी वक्तव्यं केली होती. काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांनी तीच वक्तव्यं लक्षात घेऊन आता महापालिका निवडणुकीसाठी 'एकला चलो रे'ची भूमिका घेतली आहे. जुलैपासूनच्या बातम्यांची कात्रणं दाखवून त्यांनी त्यांच्या दिल्लीतल्या नेत्यांनाही त्यासाठी राजी केलं आहे. काँग्रेसने स्वतंत्रपणे निवडणुका लढवण्याची भाषा सुरू केली, तेव्हा आघाडीतल्या कोणत्याच पक्षाने ती गांभीर्याने घेतली नाही. मनसेची हिंदी भाषिकांविरोधातली, अल्पसंख्याक समुदायांविरोधातली भूमिका जगजाहीर असल्याने महाराष्ट्रात मनसेला आघाडीत घेतलं, त्यांच्याबरोबर बसलो, तर बिहारच्या निवडणुकीत त्याचा फटका बसेल, या विचाराने काँग्रेसचे नेते ही विधानं करत असतील. बिहारची निवडणूक झाली की, त्यांची भाषा आपोआप बदलत जाईल, असा उबाठा आणि मनसेचा विश्वास होता. पण, तो सपशेल फसलेला दिसतो. बिहारमध्ये भुईसपाट होऊनही काँग्रेसच्या इथल्या नेत्यांचा आत्मविश्वास जराही कमी झालेला दिसत नाही! स्वतंत्र लढण्याच्या विचारांवर ते ठाम दिसताहेत. बिहारमधल्या दारुण पराभवानंतर महाविकास आघाडीतले अन्य घटक पक्ष काँग्रेसची किंमत कमी करणार, जागा वाटपात त्यांना दुय्यम स्थान देणार. असं दुय्यम स्थान घेऊन वाटाघाटीत सहभागी होण्याऐवजी आपणच 'एकला चलो रे'चा नारा द्यावा आणि अन्य पक्षांना मनधरणी करायला लावावी; त्यातून आपलं महत्त्व वाढवून घ्यावं, असा काँग्रेसचा डाव असल्याचं काही जण मानतात. त्यामुळे, काँग्रेसच्या या भूमिकेवर अन्य सगळे पक्ष म्हणूनच मौन बाळगून आहेत. घायकुतीला आला आहे, तो फक्त उबाठा. काँग्रेसने खरोखरच असा काही निर्णय घेतला आणि तो प्रत्यक्षात आणला, तर आपल्या नव्या मतपेढीला खिंडार पडेल; आपला संसार उघड्यावर येईल, अशी भीती त्यांना सतावू लागली आहे. 'विचारसरणी', 'वारसा', 'संस्कृती' या सगळ्या बाबींवर नंतर विचार करू. भाजपला रोखण्यासाठी आधी निवडणुकीत एकत्र राहू, अशी काकुळतीची भाषा त्यामुळेच त्यांनी सुरू केली आहे.लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने मुस्लीम मतं मिळवली. विधानसभा निवडणुकीवेळी 'लाडक्या बहिणीं'नी पारडं फिरवलं. आता इतक्या महिन्यांनंतर ते पूर्ण फिरलं आहे. पण म्हणतात ना, 'बुडत्याला काठीचा आधार'. ही मतं अजूनही आपल्या बाजूने आहेत, या गैरसमजात उबाठा आहे. काँग्रेस स्वतंत्र लढली, तर या मतांत विभागणी होईल, त्याचा फायदा महायुतीला; विशेषतः भाजपला मिळेल आणि उबाठाच्या ताकदीचा भोपळा फुटेल!! ते होऊ नये, यासाठी त्यांना काँग्रेस कसंही करून बरोबर हवी आहे. काँग्रेसला हे कळत नाही असं नाही. इतर वेळी नाकाने कांदे सोलणाऱ्यांचं नाक रगडायची हीच वेळ आहे, हे ओळखलेल्या काँग्रेसने त्यामुळेच 'धर्मनिरपेक्षतेच्या मूल्यांशी तडजोड करता येणार नाही' हा राग आळवायला सुरुवात केली आहे. मनसेला बरोबर घेतलं, तर लोकसभेवेळची मतं दूर जातात आणि नाही घेतलं, तर मराठी मतं दूर जातात, अशा कात्रीत सध्या उबाठा सापडला आहे. नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकीत त्यांचं कुठेच एक धोरण दिसत नाही. पक्ष संघटनेवर कुणाचंच नियंत्रण नाही. स्थानिक पातळीवर जो जे करेल, त्याला मैदान मोकळं आहे. पक्ष त्यांच्याच हाती, अशी अवस्था आहे. त्यामुळे, निष्ठावान शिवसैनिकांनी स्थानिक पातळीवर अनेक ठिकाणी आपलं अस्तित्व, पक्ष संघटनेची प्रतिष्ठा टिकवण्यासाठी स्थानिक पातळीवर आपापली गणितं जुळवली आहेत. दुबळ्या नेतृत्वाला त्यांना 'मम म्हणण्या'शिवाय दुसरा पर्याय नाही. नगरपालिका, नगरपंचायतीच्या निवडणुका निम्म्यावर आल्या, तरी ज्यांना आपल्या उमेदवारांची नक्की संख्या माहीत नाही, आपल्या पक्षाने किती ठिकाणी किती जणांबरोबर कशी युती केली आहे ते माहीत नाही, ते भारतीय जनता पक्षाच्या शिस्त आणि नियोजनबद्ध निवडणूक रणनीतीला कसं तोंड देणार?

# बिकट वाट वहिवाट

बिहारचे ३५वे मुख्यमंत्री म्हणून नितीश कुमार यांनी काल पदाची शपथ घेतली, तेव्हा त्यांनी भारतात सर्वाधिक काळ मुख्यमंत्री पदी राहिलेल्या आतापर्यंतच्या पहिल्या दहा मुख्यमंत्र्यांत आपलं स्थान नक्की केलं. या यादीत सिक्कीमच्या पवनकुमार चामलिंग, ओडिशाच्या नवीन पटनाईक, पश्चिम बंगालच्या दिवंगत ज्योती बसू, अरुणाचल प्रदेशच्या गेगाँग अपांग, मिझोरामच्या लाल ठाणवाला, हिमाचल प्रदेशच्या वीरभद्र सिंग आणि त्रिपुराच्या माणिक सरकारनंतर त्यांचा नंबर लागला असला, तरी त्यांची ही कारकीर्द किती मोठी ठरते, यावर ते या यादीत किती पायऱ्या वर चढणार, ते ठरेल. गंमत म्हणजे, ज्या लालूप्रसाद यादव यांच्याबरोबर त्यांनी आपल्या राजकीय प्रवासाला सुरुवात केली, काही काळ त्यांच्याबरोबर सत्तेतही राहिले, वैचारिक सहप्रवासी म्हणून सरकार बनवताना एकत्र निर्णय घेतले, त्या लालूप्रसादांच्या राष्ट्रीय जनता दलाला पराभूत करूनच नितीश कुमार यांनी दहाव्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. १९८९ ची लोकसभा आणि १९९० ची विधानसभा निवडणूक लालूप्रसाद आणि नितीश कुमार यांच्या एकत्रित नेतृत्वाखाली लढवली गेली होती. पण, मुख्यमंत्री झाल्यानंतर लालूंचे रंग बदलू लागले. त्या वादातून १९९४ मध्ये जॉर्ज फर्नांडिस यांच्या नेतृत्वाखाली 'समता पार्टी'ची स्थापना झाली. लालूंचा सामाजिक न्यायाचा अजेंडा तेव्हा एवढा जोरात होता, की समता पार्टीला यश मिळणं शक्यच नव्हतं. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, जॉर्ज आणि नितीश यांनी त्यामुळे १९९८ मध्ये एकत्र येऊन (मुख्यतः बिहारला डोळ्यासमोर ठेवून) राष्ट्रीय स्तरावर' राष्ट्रीय जनतांत्रिक गठबंधन'ची स्थापना केली. या आघाडीने नितीशना खरी चाल दिली. चारा घोटाळ्यात लालूंची प्रतिमा धुळीला मिळाली असताना तुरुंगात जाण्यापूर्वी त्यांनी राजकारणात पूर्ण अननुभवी असलेल्या पत्नी राबडीदेवी यांना मुख्यमंत्रीपदी बसवल्याने त्यांची होती नव्हती तीही मान्यता संपली. परिणामी सन २००० पर्यंत लालूंचा जनाधार घटत गेला आणि नितीश कुमार यांचा वाढत गेला!

सन २००० मध्येच नितीश कुमार यांनी पहिल्यांदा मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. पण, ते सरकार प्रत्यक्षात आलंच नाही. त्याची नुकसानभरपाई म्हणून नितीश कुमार यांची वर्णी थेट अटलजींच्या मंत्रिमंडळात, केंद्रात लागली. तिथे त्यांनी आपल्या प्रशासन कुशलतेचा चांगला ठसा उमटवला. देशभर त्यांची प्रतिमा तयार झाली. लालूंवर भ्रष्टाचाराची एकामागोमाग एक प्रकरणं शेकत असताना, त्यातून सावरण्यासाठी त्यांनी घेतलेल्या 'अतिरेकी सामाजिक न्याया'च्या धोरणाने गांवागांवात वेगळ्या चर्चा सुरू झाल्या. लालू आणि नितीश यांच्यातील त्यावेळच्या तुलनेतच नितीश पुढे निघून गेले. लालू वेगवेगळ्या आरोपात अडकत गेले. लालू आणि नितीश यांचे राजकीय-सामाजिक विचार एक असले, तरी राजकीय मूल्यकल्पना कशा वेगळ्या होत्या, याचा एक किस्सा बिहारमध्ये चांगलाच प्रसिद्ध आहे. २००५ मध्ये विधानसभा निवडणुकीत 'राष्ट्रीय जनतांत्रिक गठबंधन'ला बहुमत मिळालं. पण, ते स्पष्ट बहुमत नव्हतं. काही आमदार कमी पडत होते. त्यावर तोडगा काढण्यासाठी समता पार्टीचे अध्यक्ष म्हणून जॉर्ज यांच्या निवासस्थानी एक बैठक बसली. बैठकीला नितीश कुमार, शरद यादव, दिग्विजयसिंह असे चार-पाच महत्त्वाचे नेते होते. बरीच आकडेमोड करूनही गणित जुळत नव्हतं. शेवटी आपल्यातल्याच काही आमदारांशी बोलून निधीची व्यवस्था करावी आणि त्यातून सरकार स्थापनेच्या प्रक्रियेला गती द्यावी, अशी सूचना पुढे आली. ती सूचना ऐकून नितीश कुमार यांनी जागच्या जागी त्या सूचनेला तीव्र विरोध केला. 'अशा प्रकारे मुख्यमंत्रीपद मिळणार असेल, तर ते मला नको' असं त्यांनी त्या बैठकीत बजावलं आणि बैठक मोडली. राजकीय पेच कायम राहिला. त्यामुळे, पुन्हा निवडणूक घ्यावी लागली. ऑक्टोबर २००५ मध्ये झालेल्या त्या निवडणुकीत जनता दलाला (संयुक्त) ८८ जागा मिळाल्या! विधानसभेतील सर्वात मोठा पक्ष म्हणून बिहारी जनतेने नितीश कुमार यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब केलं. नितीश कुमार त्यावेळी पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले. पुढे त्यांनी आपला सिलसिला चालूच ठेवला.



त्याचाच पुढचा अध्याय कालपासून सुरू झाला. गेल्या १९ वर्षांच्या प्रवासात नितीश कुमार यांनी कधी लालूप्रसादांच्या राष्ट्रीय जनता दलाची साथ घेतली, तर कधी भारतीय जनता पक्षाची. त्यावरून त्यांचा 'पलटूराम' असा उपहासही झाला. पण, आपल्या राजकीय अस्तित्वासाठी आणि राजकीय अजेंड्यासाठी केलेल्या अशा तडजोडींतही त्यांची 'सुशासनबाबू' ही प्रतिमा कायम राहिली. ज्या राज्याचा उल्लेख देशात केवळ 'अतिमागास', 'जंगली', 'मध्ययुगीन मानसिकतेचे राज्य' असा केला जात होता, त्याच राज्याला त्यांनी प्रतिष्ठा मिळवून दिली. बिहारच्या आमूलाग्र परिवर्तनाला हात घातला. २०२४-२५ची ताजी आकडेवारी पाहिली, तर बिहारची अर्थव्यवस्था ८.६४ टक्के दराने वाढते; खरं तर धावते आहे!सलग १९ वर्षे मुख्यमंत्रीपदी असलेल्याच्या विरोधात आपोआपच जनमत तयार होतं. सत्तेच्या विरोधातला रोष एकवटतो, असं म्हटलं जातं. नितीश कुमार यांच्याविषयी ते घडलं नाही. उलट, त्यांचा पाठिंबा वाढतच राहिला. याचं कारण, सामाजिक बदलासाठी निर्णय करण्याचा आग्रह आणि स्वतःची मतपेढी तयार करण्याची दूरदृष्टी. समाजातील सर्वात मोठ्या घटकाला, महिलांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी सातत्याने योजना आखल्या आणि त्याची गावपातळीपर्यंत नीट अंमलबजावणी होईल, याची दक्षताही घेतली. लालूप्रसाद यांच्याप्रमाणे न वागता त्यांनी आपल्या कुटुंबाला, नातेवाइकांना राजकीय पटलापासून कटाक्षाने दूर ठेवलं. नाही. २०१४ मध्ये लोकसभा निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर लगेच मुख्यमंत्रीपद न घेता त्यांनी सामाजिक समीकरण आणि आपली प्रतिमा या दोन्हींचा विचार करून खुबीने जितनराम मांझी यांना मुख्यमंत्री केलं. राजकारणात वेगापेक्षा असा हिशोबी संयमच बहुतेकदा हुकमी यश देत असतो. निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी जाहीर केलेल्या 'मुख्यमंत्री महिला रोजगार योजने' वर चहूबाजूंनी टीका झाली. 'पोल्समॅप' या संस्थेने घेतलेल्या मतदानोत्तर चाचणीत ज्यांना या योजनेचा लाभ झाला, त्यापैकी ६९ टक्के महिलांनी 'अशाप्रकारे निवडणुकीआधी थेट लाभाच्या योजना अयोग्य असल्या'चं मत नोंदवलं. पण, हे पैसे आपल्या खात्यात कशासाठी आले, तेही त्यांना नीट माहीत होतं. त्यांनी त्यानुसार मतदानही केलं! महिलांना दिलेल्या अशा थेट लाभाच्या योजनांनी महाराष्ट्रासह इतर राज्यातही 'जादू' केली, हे जगजाहीर आहे. त्याचा लाभ नितीश कुमार यांना झालाच. पण, त्याआधी गेली काही वर्षं ते 'महिला' हाच आपला जनाधार, असं ठरवून काम करत होते. शाळेत जाणाऱ्या मुलींना मोफत सायकलपासून बचत गटांना दिलेल्या विविध प्रोत्साहन योजना, ग्रामीण जीवनोन्नती कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी त्यांना हात देऊन गेली. जात आणि जातीभेदाने ग्रासलेल्या बिहारला, बिहारच्या राजकारणाला नितीश कुमार यांनी यानिमित्ताने अलगद भौतिक कार्यक्रमांवर आणलं, हे त्यांचं यश इतिहासात कायमचं नोंदवलं जाईल. भविष्यात त्यांच्याकडून म्हणूनच अधिक अपेक्षा आहेत.

# नमस्कार : मानवी नात्यांना जोडणारी शक्ती

'नमस्कार' हा शब्द उच्चारताच मनात एक ऊबदार भावना निर्माण होते. समोरच्या व्यक्तीला मान देणे, त्याच्याशी संवादाची पहिली पायरी टाकणे आणि सामाजिक नात्यांची विण घट्ट करण्याची प्रक्रिया याची सुरुवात या छोट्याशा शब्दातून होते. म्हणूनच २१ नोव्हेंबर हा दिवस 'जागतिक नमस्कार दिन' (थेंीश्रव क्शश्रश्रे ऊू) म्हणून जगभर पाळला जातो. १९७३ मध्ये इजिप्त आणि इस्रायल दरम्यान झालेल्या युद्धानंतर शांततेचा संदेश देण्यासाठी या दिवसाची निर्मिती झाली.१८० हून अधिक देश हा दिवस पाळतात. नमस्कार हा केवळ अभिवादनाचा शब्द नाही; तो सामाजिक व्यवहारातील सभ्यता, नम्रता आणि परस्पर आदराचे प्रतीक आहे. समाजशास्त्राच्या दृष्टीने पाहिल्यास 'नमस्कार' म्हणजे मानवसंस्कृतीचा मूलभूत पाया होय. मानवी संबंध, सामाजिक भांडवल, सांस्कृतिक मूल्ये आणि शांततामय सहजीवनाची तत्त्वे यांची सांगड 'नमस्कार' या एका छोट्याशा कृतीतून दिसून येते.

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात, संवादाच्या असंख्य साधनांची उपलब्धता असली तरी मानवी नात्यांतील ऊब, आदर आणि संवेदनशीलतेचे स्थान धोक्यात येताना दिसते. व्हर्च्युअल संवाद वाढल्याने 'हॅलो', 'हाय' अशी इंग्रजी स्वरूपातील अभिवादने प्रचलित झाली; परंतु भारतीय 'नमस्कार' या संकल्पनेतील सांस्कृतिक खोली आजही अधिक प्रभावी आहे. भारतीय समाजात अभिवादन हा एक संस्कार मानला जातो. वडीलधाऱ्यांना वंदन करणे, पाहुण्यांचे स्वागत करणे, रस्त्यावर भेटलेल्या व्यक्तीला नम्रपणे 'नमस्कार' म्हणणे ही कृती मनातील आदर जागवते. एखाद्या व्यक्तीला केलेला नमस्कार म्हणजे त्याच्या अस्तित्वाची पावती होय. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता 'नमस्कार' ही सामाजिक सलोखा, स्नेहभाव, समुदायभावना आणि नागरिकांमधील विश्वास वाढवणारी कृती आहे. आजचा काळ तंत्रज्ञानाने अवकाश कवेत घेतलेला काळ आहे. पण त्याच वेळी व्यक्तिगत एकाकीपण, तणाव, भीती, मानसिक आरोग्याशी संबंधित संकटे वाढत आहेत. मानसशास्त्र सांगते की, सर्वात छोटा सामाजिक संकेत जसे की स्मित, अभिवादन, नमस्कार ही कृती व्यक्तीला सामाजिक अस्तित्वाची जाण करून देते, आत्मविश्वास वाढवते आणि सकारात्मक ऊर्जा देते. म्हणून 'नमस्कार' ही संस्कृती केवळ आदराची खूण नसून मानसिक आरोग्याच्या दृष्टीनेही महत्त्वाची आहे. एखाद्या अनोळखी व्यक्तीलाही नमस्कार केल्यावर तो क्षण एक प्रकारची सुरक्षितता निर्माण करतो. अनोळखी लोकांमधील संवादाची सुरुवात तणाव कमी करते आणि सामाजिक विश्वास वाढवते. म्हणूनच सार्वजनिक ठिकाणी, शाळा-कॉलेजमध्ये, शासकीय कार्यालयांत किंवा गावपातळीवरील सामूहिक जगामध्ये अभिवादन संस्कृती वाढवणे म्हणजे सामाजिक सकारात्मकतेचा पाया मजबूत करणे होय.समाजशास्त्रामध्ये अभिवादनाला 'प्रतीकात्मक आंतरक्रीयावाद' याच्या मुळाशी सामावलेले मानले जाते. प्रत्येक व्यक्ती स्वतःबद्दल आणि इतरांबद्दलची धारणा निर्माण करताना या प्रतीकात्मक कृतींचा आधार घेतो. 'नमस्कार' हा केवळ हात जोडणे किंवा शब्द उच्चारणे नाही; तो आपल्या संस्कारांचे, मूल्यांचे आणि सामाजिक ओळखीचे प्रतीक आहे. एका व्यक्तीचा नमस्कार दुसऱ्यात आदर, स्वीकार आणि सुरक्षिततेची भावना निर्माण करतो. यामुळे सामाजिक नातेसंबंध दृढ होतात. परिणामी समाजातील तणाव घटतो, स्पर्धा आणि संघर्षाच्या वातावरणात मानवी संवेदना टिकून राहतात. जागतिक नमस्कार दिनाचा मुख्य संदेश हा जगातील शांतता, सौहार्द, संवाद आणि सामोपचार टिकवण्याचा आहे. आज जेव्हा देशांमध्ये राजकीय तणाव, सांस्कृतिक संघर्ष, धार्मिक मतभेद, हिंसा आणि डिजिटल दरी वाढत आहे, तेव्हा 'हॅलो' किंवा 'नमस्कार' हा शब्द छोटा असला तरी त्यामागील विचार मोठा आहे, तो म्हणजे संवादाद्वारे तणाव कमी करणं. इतिहास सांगतो की युद्ध, संघर्ष आणि कटुता हे गैरसमजातून वाढतात. संवादाची पहिली पायरी म्हणजे अभिवादन होय. त्यामुळे जागतिक नमस्कार दिन हा शांततेच्या प्रक्रियेतील एक प्रतीकात्मक पाऊल आहे. भारतीय समाजात 'नमस्कार' दिन साजरा करण्याचे सामाजिक महत्त्व अधिक व्यापक आहे. नमस्कार म्हणजे संस्कृती टिकवण्याचा मार्ग आणि सामाजिक भांडवल वाढवण्याचे साधन आहे. आधीच्या पिढ्या सकाळी उठल्याक्षणी घरातील ज्येष्ठांना नमस्कार करून दिवसाची सुरुवात करायच्या. आजच्या पिढीत हे बंधन शिथिल झाले; परंतु अभिवादन संस्कृतीचे मूल्य आज अधिकाधिक महत्त्वाचे आहे. समाज माध्यमांवरील आभासी जगात 'हाय', 'हॅलो', 'गुड मॉर्निंग'चे संदेश हजारो मिळतात, पण प्रत्यक्ष आयुष्यातील नमस्कार देणारा जवळचा माणूस नसल्यास त्या संबंधांचा ऊबदारपणा टिकत नाही. याच आनुषंगाने, या दिवशी शाळा-महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना अभिवादनाचे महत्त्व शिकवणे आवश्यक आहे. वर्गात प्रवेश करताना शिक्षकाला नमस्कार करणे, मित्रांना अभिवादन करणे, एकमेकांचा आदर राखणे, ही छोटी कृती मुलांमध्ये सामाजिक कौशल्ये विकसित करते. आजची युवा पिढी तंत्रज्ञानात प्रचंड वेगाने प्रगती करत असली तरी सामाजिक कौशल्यांमध्ये घट जाणवते. मूलभूत संवादकौशल्य, सौजन्य, विनम्रता व परस्पर आदर या मूल्यांत सातत्य ठेवणे आवश्यक आहे. नमस्कार हा केवळ परंपरा नाही, तर सामाजिक, भावनिक शिक्षणाचा मूलाधार आहे.याहूनही महत्त्वाचे म्हणजे विविधतेने नटलेल्या भारतीय समाजात 'नमस्कार' ही कृती सर्वांना जोडणारा पूल आहे. भाषा, धर्म, जात, प्रदेश, वंश, आर्थिक विभाजन या सर्व भिंतींच्या पलीकडे 'नमस्कार' हा समान संस्कार आहे. महामार्गावर भेटलेला ट्रकचालक असो, सायकलवर जाणारा शेतकरी असो, उंच इमारतीत राहणारा व्यावसायिक असो किंवा गावातील वृद्ध महिला-पुरुष असो 'नमस्कार' हा शब्द सर्वांना सारखाच ऊबदार वाटतो. सामाजिक समता आणि परस्पर आदर टिकवण्यास ही कृती महत्त्वाची ठरते. आजच्या काळात संवादाच्या तुटलेल्या धाग्यांची जुळवाजुळव करणे ही मोठी गरज आहे. कुटुंबांमध्ये पिढ्यांमधील संवाद कमी झाला आहे, समाजात परस्पर अविश्वास वाढतो आहे, सार्वजनिक क्षेत्रात चिडचिड, आक्रमकता आणि असहिष्णुता वाढत आहे. पण या नकारात्मकतेत 'नमस्कार' हा छोटासा शब्द मनातला राग विरघळवतो, नव्या संवादाचे दार उघडतो आणि सामाजिक ऊबदारपणा निर्माण करतो. मानसशास्त्रीयदृष्ट्या नमस्कार केल्याने हसरा चेहरा आणि नम्र आवाज मेंदूतील सकारात्मक हार्मोन्स सक्रिय करतात. त्यामुळे व्यक्तीचा मूड सुधारतो, तणाव कमी होतो आणि नात्यांमध्ये सौम्यता वाढते. जागतिक नमस्कार दिन हा केवळ औपचारिक दिन नाही; तो सामाजिक संवेदना, मानवता आणि परस्पर आदराचा उत्सव आहे. वाईट बातम्यांनी भरलेल्या जगात चांगल्या संवादाची, सकारात्मक सामाजिक वर्तणुकीची आणि मानवी मूल्यांची गरज पूर्वीपेक्षा अधिक आहे. खरा संवाद 'नमस्कार'पासूनच सुरू होतो. एखाद्या छोट्या अभिवादनानेही आपण एखाद्याच्या मनात आशेचा दिवा पेटवू शकतो. आज या दिवसाचे औचित्य साधून आपण आपल्या जीवनात खालील विचार दृढ करणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीला मान द्या, कोणालाही भेटताना अभिवादन करण्याची संस्कृती रुजवा, नात्यांमध्ये संवादाची दारे सतत उघडी ठेवा आणि समाजात सकारात्मकतेचा संदेश पसरवा. जागतिक नमस्कार दिन आपल्याला स्मरण करून देतो की, मोठा बदल करण्यासाठी मोठी भाषणे किंवा मोठी कृती आवश्यक नसते; कधी कधी एका साध्या 'नमस्कार'मध्येही मानवतेचे सर्वात मोठे सामर्थ्य दडलेले असते. म्हणूनच आजच्या या जागतिक नमस्कार दिनी आपण सर्वांनी एकच संकल्प करूया की प्रत्येक दिवशी भेटलेल्या प्रत्येक व्यक्तींना मनापासून अभिवादन करायचे. 'नमस्कार' या शब्दात सामाजिक बंधुभावाचे, संस्कारांचे आणि शांततेचे बीज आहे. या बीजातूनच मानवतेचा वटवृक्ष उभा राहतो. नमस्कार म्हणजे फक्त अभिवादन नाही; तो मनुष्यत्वाचा उत्सव आहे.

# मेळघाटमधील कुपोषणामुळे मृत्यूचे वाढते प्रमाण गंभीर व चिंताजनक!

सरकार मेळघाटातमधील कुपोषण ग्रस्त भागात दुर्लक्ष करीत आहे हि बाब उच्च न्यायालयाने राज्य सरकारला फटकारल्यावरून स्पष्ट होते.आदिवासीबहुल मेळघाटात कुपोषणामुळे होणाऱ्या बालमृत्यूचा प्रकार भयावह व चिंताजनक आहे.असा संताप मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ ला व्यक्त केला आणि या मुद्यावर सरकार बेजबाबदारपणाने काम करीत असल्याचे उच्च न्यायालयाने राज्य सरकारला चांगलेच फटकारले.मेळघाट परिसरात जून २०२५ ते आतापर्यंत शून्य ते सहा महिन्यांच्या वयोगटातील ६५ बालकांनी प्राण गमावले असे न्या.रेवती मोहिते डेरे आणि न्या.संदेश पाटील यांच्या खंडपीठाने नोंदवले व असेही सांगण्यात आले की हा भयावह प्रकार आहे,सरकारने याबाबत चिंता दाखविली पाहिजे असे न्यायालयाने म्हटले आहे.आपण म्हणतो की महाराष्ट्र विकासाच्या मार्गावर जात ही बाब सत्य आहे.परंतु राज्यातील अती दुर्गम भाग आजही अत्यंत पिछाडीवर आहे आणि हा प्रकार मेळघाटमध्ये वाढत्या बालमृत्यूच्या प्रमाणावरून स्पष्ट दिसून येतो यावर सरकारने डोळ्यात तेल घालून काम करण्याची नितांत गरज आहे. मेळघाटात कुपोषणामुळे जूनपासून आतापर्यंत ६५ बालकांचा मृत्यू झाला ही बाब भयानक असुन अत्यंत चिंताजनक आहे. अमरावती जिल्ह्यातील आदिवासीबहुल मेळघाटात कुपोषणामुळे मुले, गर्भवती आणि स्तनपान करणाऱ्या मातांच्या मृत्यूंची संख्या वाढत असल्याची अनेक जनहित याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या आहेत.या याचिकांवर न्या.रेवती मोहिते डेरे आणि न्या.संदेश पाटील यांच्या खंडपीठाची सुनावणी झाली.जूनपासून आतापर्यंत शून्य ते सहा महिने वयोगटातील ६५ बालकांचा कुपोषणामुळे मृत्यू होणे ही राज्यासाठी अत्यंत चिंताजनक आणि भयावह बाब आहे. सरकारने हे गांभीर्याने लक्षात घेतले पाहिजे, असे खंडपीठाने राज्य सरकारला सुनावले.राज्य सरकार सार्वजनिक आरोग्याच्या प्रश्नावर गंभीर नाही,अशीही टिप्पणी न्यायालयाने केली आहे.सरकार अनेक योजना राबवित असते परंतु राज्यातील मेळघाटात सारख्या अनेक दुर्गम भागाकडे लक्ष नसल्याचे मेळघाटाच्या वाढत्या कुपोषणाच्या मृत्यूवरून स्पष्ट दिसून येते.राज्यामध्ये अनेक सरकारे आलीत आणि गेलीत परंतु सर्वांनीच अती दुर्गम भागाकडे दुर्लक्ष केले आणि त्याचे प्रायश्चित्त आजही मेळघाटात सारख्या अती दुर्गम भागातील आदिवासी भागांमध्ये कुपोषणामुळे बालमृत्यूचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते. आज देश स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झालीत तरीही राज्यासह देशातील अनेक अती दुर्गम भागातील नागरिकांचे हाल बेहाल होतांना दिसतात. आजही अती दुर्गम भागात पुरेशा आरोग्य सुविधा उपलब्ध नाही, शिक्षणासाठी गावकऱ्यांना व विद्यार्थ्यांना आटापिटा करावा लागतो,रूग्णांना झोळीच्या सहाय्याने अनेक किलोमीटर अंतरापर्यंत रुग्णालयात पायदळ न्यावे लागते ही भयावह परिस्थिती राज्यासह भारतातील अनेक दुर्गम भागातील राज्यांमध्ये दिसून येते.त्यामुळे राज्यासह देशात सर्वच काही ठीक आहे असे म्हणता येणार नाही.अती दुर्गम भागातील परिस्थितीचा विचार करून नियुक्ती केलेल्या डॉक्टरांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने सरकारने डॉक्टरांच्या प्रती पाऊले उचलली पाहिजेत व तेथील परिस्थिती सुधारण्यासाठी योग्य त्या उपाययोजना केल्या पाहिजेत.माझ्या मते सर्वच पक्षांचे राजकीय पुढारी अति दुर्गम भागात मुद्दाम दुर्लक्ष करतात कारण त्यांना याठीकाणी पाहिजे त्या प्रमाणात मतदान होत नसावे हे सुद्धा कारण राहु शकते यालाही नाकारता येत नाही.सरकारची यंत्रणा अति दुर्गम भागात विकसित झाली तर आदिवासी नागरिकांना योग्य लाभ अवश्य होईल.अतिशय दुर्दैवी परिस्थिती आहे की सरकार सार्वजनिक आरोग्याचा मुद्दा हलक्यात घेत आहेत मुख्यत्वे करून आदिवासी भागात हा अत्यंत चिंताजनक व गंभीर विषय आहे.यावर सरकारने गांभीर्याने लक्ष केंद्रित करून मेळघाटात सारख्या अति दुर्गम भागातील नागरिकांना योग्य न्याय देऊन त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याची गरज आहे.जय हिंद.

—रमेश कृष्णराव लांजेवार

# देवणे वाडीत सेवा जनशक्ती पार्टीच्या प्रचाराला सुरुवात सटवा आप्पा चौकले यांच्या उमेदवारीची घोषणा

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

नगर परिषद निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर सेवा जनशक्ती पार्टीतर्फे प्रभाग क्रमांक ७ मधील प्रचार मोहिमेची आज देवणे वाडी येथे शुभारंभ करण्यात आला. देवणे वाडी येथील प्रसिद्ध सटवा आप्पा मंदिरात नारळ फोडून प्रचाराची सुरुवात करण्यात आली. पक्षाचे पक्षप्रमुख प्रा. मनोहर धोंडे यांनी नारळ फोडून प्रचाराचे औपचारिक उद्घाटन केले.

प्रभाग क्रमांक ७ साठी सेवा जनशक्ती पार्टीकडून *सटवा आप्पा चौकले* यांची उमेदवार म्हणून घोषणा करण्यात आली आहे. या कार्यक्रमास पक्षाचे तालुकाध्यक्ष गोविंद हापगुंडे, प्रभाग क्रमांक २ चे उमेदवार शुभम घोडके, जिल्हा उपाध्यक्ष मनोज शेवगावकर,गणेश घोडके, साधू पाटील वडजे, सूर्यकांत आनेराव, प्रभाग क्रमांक १ उमेदवार कल्याण वसमतकर, प्रभाग क्रमांक ९ (ब)चे माधव वनलवाड,तसेच देवणे वाडी येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मतदानाचा आशीर्वाद सटवा आप्पा चौकले यांना द्या– प्रा.मनोहर धोंडे**





यावेळी बोलताना प्रा. मनोहर धोंडे म्हणाले की २ डिसेंबर रोजी होणाऱ्या मतदानात प्रभाग क्रमांक ७ मधील मतदारांनी सेवा जनशक्ती पार्टीच्या उमेदवाराला विजयी कराव. त्यांनी पूर्वी निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींवर टीका करताना, आपण अनेकांना मतदान दिलं, पण त्यांनी आपल्याला काय दिलं? असा प्रश्न उपस्थित केला.धोंडे यांनी सांगितले की या शहरात पाच पाच वर्षे दहा दहा वर्षे झाली त्यांची शहरात कार्यालय किंवा ऑफिस सुधा नाहीत .तर मनोहर धोंडे चे आज गेलि १७ वर्षे झाली शहरात कार्यालय ठेवून लोकांची कामे केली असून लोकांचे काम न करता कोणालाही परत पाठवले नाही. तो कोणत्याही जातीचा किंवा कोणत्या पक्षाचा आहे आस विचारलं नाही जो आला त्यांची कामे करून दिली .काही पक्षांकडून पैशांच्या जोरावर निवडणुका लढवल्या जात असल्याची टीकाही त्यांनी केली.

धोंडे म्हणाले की मागील निवडणुकांमध्ये दिलेल्या आश्वासनांपैकी रस्ता, नाली, प्रकाश व्यवस्था, पाणीपुरवठा अशा कोणत्याही बाबींची उभारणी झालेली नाही. १०० कोटींची नळयोजना केलि आणि लोहा शहराला पाणी आजुन नळाला पाणी नाही. नगरपालिकेच्या मुख्य रस्तावर लाईट नाही,नगरपालिकेने घरकुल योजनांतही योग्य तो लाभ दिला नसल्याचा व निधीच्या वापरात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा आरोप त्यांनी केला. तर नगरपालिकेत १०० कोटी पेक्षा जास्त भ्रष्टाचार झालेला आहे असेही ते म्हणाले.

**देवणे वाडी–वार्ड ७ यांनी एकत्र येऊन उमेदवाराला विजय द्यावा**

आपण दिलेल्या उमेदवारांमध्ये सर्वसामान्य कुटुंबातील लोकांना संधी मिळावी या हेतूने उभे केले असल्याचे धोंडेनी सांगितले. आमचे उमेदवार जाड–जूड मालदार,किंवा लादनित बसणारे नाहीत ,तरी ते सर्वसामान्य लोकांचे उमेदवार आहेत, एका पक्षात घरचेच सहा उमेदवार आहेत यात स्वत: स्वत:ची बायको,भाऊ ,भाउजयी,मेव्हणे,भाचे,आशे एका परिवारातले सहा उमेदवार भाजपाने दिले.तर दुसरी कडे एकाच रात्री तुन पक्ष बदलणारे आहेत याचाही आपण विचार केला पाहिजे.असे ते म्हणाले. निधी कुठून आणायचा, कसा आणायचा – याची माहिती मनोहर धोंडे ला माहिती आहे , असेही त्यांनी सांगितले.

**प्रचाराला शुभारंभ**

कार्यक्रमाच्या स्थानी नारळ फोडून प्रचार मोहिमेची औपचारिक सुरुवात करण्यात आली. प्रभाग क्रमांक ७ मध्ये सेवा जनशक्ती पार्टीचे सटवा आप्पा चौकले हे उमेदवार निवडून आल्यास विकासाचे काम करून दाखवू असे आश्वासन पक्षपक्षप्रमुखांनी व्यक्त केले.

# केज येथे चंपाषष्टी निमित्त लंगर तोडण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी केज येथे चंपाषष्ठी निमित्त लंगर तोडण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.केज शहरामध्ये खंडोबा मंदीर परिसर येथे चंपाषष्ठी निमित्त वारूवाल्याचे, आराधी वाल्याचे असे प्रत्येक वर्षी कार्यक्रम होतात अहिल्या नगर येथील मंदीरात लंगर तोडणे,वाघ्या मुरळी, गोंधळी,आराधी मंडळ यांचे कार्यक्रम दरवर्षी प्रमाणे होणार असून पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी कार्यक्रमाचा तसेच महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन बिभीषण गाढवे तसेच शिवाजी चेपट यांनी केले असून या कार्यक्रमात लंगर तोडला जातो, वारूवाले वसारी खेळतात,आराध्याची गाणी होतात आणी चंपाषष्ठी निमित्त मोठा भंडारा म्हणजेच जेवणाचा आणि महा प्रसादाचा कार्यक्रम होतो



तरी पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ आवश्य घ्यावा असे आवाहन आयोजकांकडून करण्यात येत आहे.


# शासनाने शेतकऱ्यांना दिलेले अतिवृष्टीचे अनुदान बॅंकेने कर्ज खात्यात जमा करु नये–साहेबराव पाटील काळे

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

शासनाने शेतकऱ्यांना दिलेले अतिवृष्टीचे अनुदान बॅंकांनी कर्ज खात्यात जमा करु नये अशी मागणी लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक साहेबराव पाटील काळे यांनी शासनाकडे केली आहे.

पुढे लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक साहेबराव पाटील काळे यांनी असे नमूद केले की,

लोहा तालुक्यात जुन ते सप्टेंबर दरम्यान प्रचंड प्रमाणात अतिवृष्टी होऊन शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले असल्यामुळे शासनाने यांची दखल घेऊन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई



म्हणून शेतकऱ्यांच्या खात्यावर प्रत्येकी १० हजार रुपये जमा केले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना थोडासा दिलासा मिळाला आहे.

पण अनेक बॅंका हे शासनाने शेतकऱ्यांना दिलेल्या अनुदानाला होल्ड करीत असुन शासनाने शेतकऱ्यांना दिलेले अनुदान हे कर्ज खात्यात जमा करीत आहेत. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे.

अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान प्रचंड आहे. मदतीचा हात म्हणून शासन शेतकऱ्यांना आर्थिक मदत करीत आहे पण बॅंकांनी या अनुदानावर डोळा ठेवून ते कर्ज खात्यात जमा केल्यास शेतकऱ्यांवर मोठ्या प्रमाणात अन्याय होणार आहे.

तेव्हा याकडे तात्काळ शासनाने व जिल्हा प्रशासनाने लक्ष देऊन शासनाने शेतकऱ्यांना दिलेले अतिवृष्टीचे अनुदान बॅंक खात्यात जमा करु नये अशी मागणी लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक साहेबराव पाटील काळे यांनी केली आहे.

## निवडणुका असल्याने दोन्ही बाजूला नाराजी

# महायुतीमधील नेत्यांचे पक्षांतर होणार नाही मंत्री प्रताप सरनाईकांची महत्त्वाची माहिती

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई (वृत्तसंस्था)**–उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेच्या मंत्र्यांनी आजच्या मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार टाकला. भाजपवर मित्रपक्षांचे पदाधिकारी फोडण्याचा आरोप करत शिवसेनेने ही भूमिका घेतली. त्यामुळे ऐन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर राज्याचे राजकारण तापल्याचे पाहायला मिळाले. तसेच त्यानंतर मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन आपल्या भावना व्यक्त केल्याचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले आहे. महायुतीमधील पक्षातील नेते, पदाधिकारी तसेच कार्यकर्ते एकमेकांच्या पक्षात घ्यायचे नाहीत असा निर्णय आजच्या बैठकीत झाल्याचे देखील त्यांनी सांगितले आहे.मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, नाराजीचा काही प्रश्न नाही, एका कुटुंबातही वादविवाद होत राहतात. हे तर तीन पक्षांचे सरकार आहे. त्यामुळे थोड्या काही मनातल्या भावना ज्या आहेत त्या व्यक्त करायच्या असतात. आज माननीय मुख्यमंत्र्यांकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब आणि आम्ही सगळे मंत्री गेलो होतो आणि आमच्या काही भावना त्यांच्यासमोर व्यक्त केल्या आणि त्यावर तोडगा सुद्धा निघाला.पुढे बोलताना प्रताप सरनाईक म्हणाले, राज्यात निवडणुका आहेत, निवडणुकांचे पडघम वाजू लागल्यानंतर पक्षांतराचे वारे हे मोठ्या प्रमाणात येतात. कोणी या पक्षातून त्या पक्षात असे हे चालू होते. प्रत्येक जिल्ह्यात पक्षांतर सुरू होती, त्यात पालघर जिल्हा



आहे, सोलापूर जिल्हा आहे, कोल्हापूर आहे, ठाणे आहे, कल्याण डोंबिवली आहे. त्यामुळे काही प्रमाणात आमच्या पक्षात नाराजी होती. तसेच काही प्रमाणात नाराजी त्यांच्या पक्षात होती. ही नाराजी नेमकी काय आहे, हे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी समजून घेतले आणि त्यावर तोडगा काढला.प्रताप सरनाईक म्हणाले, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यासोबत बैठक झाल्यानंतर असा निर्णय झाला आहे की कोणीही कुठल्याही पक्षातला प्रामुख्याने महायुतीमधले जे पक्ष आहेत, आठवले साहेबांचा आरपीआय आहे, भाजप आहे किंवा शिवसेना आहे आणि त्याच बरोबर अजित पवारांचा राष्ट्रवादी पक्ष आहे. या पक्षातले नेते, पदाधिकारी किंवा कार्यकर्ते कोणीही कोणत्या पक्षात घेऊ नये अशा प्रकारची भूमिका ठरली आहे. त्यामुळे कुठलीही नाराजी अशी नाही. काही ठिकाणी विसंवाद होत होता आणि हा विसंवाद होऊ नये असे आमचे ठरले आहे.

# कर्जमाफी महत्त्वाचीच आहे,पण ते अंतिम उत्तर नाही–देवेंद्र फडणवीस

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई (वृत्तसंस्था)**–शेतकऱ्यांच्या कर्ज माफीवरून राज्यातील राजकारण चांगलेच तापले असताना आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या नव्या वक्तव्यामुळे या चर्चेला नवे वळण मिळाले आहे. अलीकडच्या अतिवृष्टीमुळे मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात झालेले शेतीचे नुकसान, त्यावरचे भरपाईचे पॅकेज आणि कर्जमाफीची मागणी, या सर्वांवर विरोधक सरकारला घेरत असतानाच फडणवीस यांनी कर्जमाफी महत्त्वाचीच आहे, पण कर्जमाफी हे अंतिम उत्तर नसल्याचे स्पष्ट केले आहे.



यामुळे सरकारची भूमिका नेमकी काय? असा प्रश्न पुन्हा एकदा पुढे आला आहे.

मराठवाड्यात मागील काही दिवसांत अतिवृष्टी झाली आणि अनेक भागामध्ये शेतजमिनी, पिके, गुरेढोरे वाहून गेली. या अनपेक्षित आपत्तीमुळे हजारो शेतकरी अडचणीत सापडले. राज्य सरकारने नुकसानभरपाईसाठी पॅकेज जाहीर केले असले तरी ते अत्यल्प असून शेतकऱ्यांच्या दु:खाला न्याय देणारे नाही, अशी टीका विरोधकांनी केली. उद्धव ठाकरे स्वतः मराठवाड्यात दौऱ्यावर गेले होते आणि त्यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. त्यांनी राज्य सरकारची पहिल्या टप्प्यातील मदत प्रत्यक्षात शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली का, याचा आढावा घेत सरकारवर तीव्र टीका केली. तसेच आमच्या सरकारने सर्वसमावेशक कर्जमाफी केली होती, याच धर्तीवर या सरकारनेही तत्काळ कर्जमाफी करावी, अशी मागणी त्यांनी पुन्हा एकदा केली.याच पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधताना कर्जमाफीबाबत मोठे विधान केले. ते म्हणाले की, कर्जमाफी नक्कीच महत्त्वाची आहे. आम्ही ती महत्त्वाचीच मानतो. पण कर्जमाफी हे शेती समस्येचं अंतिम उत्तर नाही. यामुळे तात्पुरता दिलासा मिळतो, पण भविष्यातील संकट टळत नाही. फडणवीस पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या मिशननुसार राज्यातील २५ हजार हेक्टर शेती नैसर्गिक शेतीकडे वळवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासाठी बियाणे कंपन्यांना आवश्यक ते मार्गदर्शन देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

## पुणे ते शिरूर,शेंद्रा ते बिडकीन, बिडकीन ते ढोरेगाव रस्ता निर्मितीला मान्यता

# छत्रपती संभाजी नगर ते अहिल्यानगर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

पुणे ते शिरूर राष्ट्रीय महामार्गावरील ५३.४ किलोमीटर अंतरातील चार पदरी जमिनीला समांतर (ट ग्रेड) व सहा पदरी उन्नत महामार्गासह छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शेंद्रा औद्योगिक वसाहत ते बिडकीन औद्योगिक वसाहत आणि बिडकीन ते ढोरेगाव (छत्रपती संभाजी नगर ते पुणे महामार्ग) सहा पदरी रस्ता निर्मितीला मंत्रालयात आयोजित मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यासोबतच नवीन ग्रीनफिल्ड रस्ता छत्रपती संभाजीनगर – जालना डीएमआयसी नोड क्रमांक एक करमाड ते बिडकीन मार्गे समृद्धी महामार्गास सहा पदरी रस्ता जोडणी या नवीन आखणीस तत्वतः मान्यता देण्यात आली. छत्रपती संभाजी नगर ते अहिल्यानगर दरम्यान सद्यस्थितीत असलेल्या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून नागरिकांचा त्रास कमी करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.

बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, मुख्य सचिव राजेश कुमार उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले, पुणे ते शिरूर या महामार्गावरील सहा पदरी उन्नत मार्ग आणि चार पदरी जमिनीच्या समतल (ट ग्रेड) मार्गाचे काम तीन वर्षात पूर्ण करावे. रस्ता विहित कालावधीत पूर्ण करण्यात यावा. या रस्त्याच्या निर्मितीमध्ये कुठही दिरंगाई होऊ नये. पुणे ते छत्रपती संभाजीनगर महामार्गावर पुणे ते शिरूर दरम्यान औद्योगिक वसाहती असल्याने वाहनांची अत्यंत वर्दळ आणि भविष्यातील वाढणारी वाहनांची संख्या लक्षात घेता महामार्गाचे काम विनाविलंब सुरू करावे. पुणे ते शिरूर महामार्गावर ३५ किलोमीटर उन्नत महामार्गापैकी ७.४० किलोमीटर लांबीमध्ये जमिनीला समांतर रस्ता, त्यावर रस्ता व वरती मेट्रो अशा व्हाया डक्टची निर्मिती महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड आणि महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास मंडळ यांनी समन्वयाने करावी. छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील शेंद्रा (करमाड) ते बिडकीन या ३२.८ किलोमीटर लांबी, बिडकीन ते ढोरेगाव या २६ किलोमीटर लांबीच्या सहा पदरी रस्ता निर्मितीच्या कामासाठी आवश्यक जमिनीचे भूसंपादन तातडीने सुरू करावे, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. बैठकीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रमुख सचिव मनीषा म्हैसकर यांनी सादरीकरण केले. बैठकीला अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी गुप्ता, प्रधान सचिव (विधी व न्याय) सुवर्णा केवले, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आदी उपस्थित होते.



# परळी नगर परिषद निवडणूक: प्रभाग १ मध्ये महायुती उमेदवारांच्या प्रचाराला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## महायुती नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी व प्रभाग क्र.१ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार दिपक मुंडे व भाजपचे उमेदवार सौ.वंदना अश्विनकुमार आघाव यांना मतदारांचा वाढता पाठींबा

दैनिक वादळ वार्ता

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी नगर परिषदेच्या निवडणुकीची धामधूम चांगलीच वाढली असून प्रभाग क्र. १ मधील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचाराला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसत आहे. महायुतीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, प्रभाग १-ब मधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार श्री. दिपक प्रल्हादराव मुंडे आणि प्रभाग १-अ मधील भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार सौ. वंदना अश्विनकुमार आघाव यांनी मतदारांशी संवाद साधला. सर्व उमेदवारांना मतदारांची पसंती मिळत आहे.

प्रभाग क्र.१ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार दिपक मुंडे व भाजपचे उमेदवार सौ. वंदना अश्विनकुमार आघाव तर नगराध्यक्षपदासाठी सौ. पदमश्री धर्माधिकारी यांना आम्ही आमचे मतदान रूपी आशीर्वाद देणार असल्याचे मतदार बोलुन दाखवत आहेत. प्रभागातील विविध भागात जाऊन केलेल्या प्रचार मोहिमेमुळे या उमेदवारांना मतदारांकडून उत्साहवर्धक प्रतिसाद मिळत असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले. गाठीभेटीदरम्यान मतदारांनी आपापल्या अडचणी, प्रभागातील आवश्यक कामे तसेच विकासाच्या गरजा उमेदवारांसमोर मांडल्या. उमेदवारांनीही या मुद्द्यांकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहून भविष्यात विकासकामांना प्राधान्य देण्याचे आश्वासन दिले. प्रभाग क्र. १ मधील उमेदवारानांच प्रचंड मताधिक्य देणार असल्याचा शब्द दिला आहे.




आ.धनंजय मुंडे आणि ना.पंकजाताई मुंडे यांनी परळीच्या विकासासाठी उपलब्ध करून दिलेल्या निधीच्या माध्यमातून शहरात झालेल्या विविध कामांचा उल्लेखही प्रचारादरम्यान करण्यात आला. प्रभू वैद्यनाथ देवस्थान विकासासाठी झालेली तरतूद आणि शहरातील प्रकल्पांवर झालेली प्रगतीही मतदारांसमोर मांडण्यात आली. प्रभाग १ मधील विविध भागांत उमेदवारांनी आयोजित केलेल्या बैठका, गाठीभेटी आणि संवाद कार्यक्रमांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. मतदारांशी सातत्याने संवाद साधत असल्याने उमेदवारांची ओळख आणि विश्वास वाढत आहे. परळी नगर परिषद निवडणुकीचे मतदान २ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७:३० ते सायं ५:३० या वेळेत होणार आहे. लोकांच्या मदतीला धावुन येणार्यालाच निवडुन देण्याचा मतदारांचा निर्धार मतदार बांधवानी केला आहे. त्यामुळे प्रभाग क्र. १ मधील उमेदवार यांचे पारडे जड झाले आहे. मतदारांच्या भेटी घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. अडीअडचणी समजावून घेतल्या. आपले मत प्रभागाच्या विकासासाठी, प्रभागाच्या उज्वल भविष्यासाठी...परळीच्या सर्वांगीण विकासासाठी वरील सर्व उमेदवारांना प्रचंड बहूमतांनी विजयी करा घड्याळ व कमळ या चिन्हासमोरील बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन केले आहे.

# तंत्रज्ञान आणि तत्परता! २.८७ लाखांचे हरवलेले मोबाईल २० दिवसांत हस्तगत; धडगाव पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी

## सीईआयआर पोर्टलच्या बळावर मूळ मालकांना परत मिळाला ऐवज; नागरिकांकडून पोलिसांचे आभार

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी । मोलगी**

पोलिस अधीक्षक श्रवण दत्त आणि धडगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेंद्र जगताप यांच्या उत्कृष्ट मार्गदर्शनाखाली धडगाव पोलिसांनी नागरिकांचे हरवलेले आणि चोरीला गेलेले महागडे मोबाईल शोधून काढण्यात लक्षणीय यश मिळवले आहे. विशेष म्हणजे, अवघ्या २० दिवसांपूर्वी सीईआयआर पोर्टलचे प्रशिक्षण घेतलेल्या दोन कर्तव्यनिष्ठ कर्मचाऱ्यांनी ही अविश्वसनीय कामगिरी करून दाखवली.

२० दिवसांत २,८७,००० चा मुद्देमाल हस्तगत

पोलीस कॉन्स्टेबल मनिष रामसिंग पावरा आणि पोलीस कॉन्स्टेबल वसावे यांनी सीईआयआर पोर्टलचे प्रशिक्षण नुकतेच पूर्ण केले होते. या प्रशिक्षणाचा लगेचच प्रभावी उपयोग करत, या दोघांनी केवळ २० दिवसांच्या विक्रमी वेळेत दोन लाख सत्ताऐंशी हजार रुपये किमतीचे अनेक गहाळ झालेले व चोरीला गेलेले मोबाईल यशस्वीरित्या हस्तगत केले.




या कामगिरीमुळे धडगाव पोलीस दलाची तत्परता आणि आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करण्याची क्षमता सिद्ध झाली आहे. गहाळ झालेल्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करून, नागरिकांची मालमत्ता सुरक्षित ठेवण्यासाठी पोलीस दल किती तत्पर आहे, हे त्यांनी दाखवून दिले.

धडगाव पोलीस स्टेशनच्या वार्षिक तपासणीच्या निमित्ताने आयोजित केलेल्या पोलीस पाटील बैठकीदरम्यान उपविभागीय पोलीस अधिकारी, दत्ता पवार सो. यांच्या हस्ते हे सर्व हस्तगत केलेले मोबाईल त्यांच्या मूळ मालकांना परत करण्यात आले.आपला मौल्यवान मोबाईल परत मिळाल्यानंतर नागरिकांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि समाधान स्पष्टपणे दिसत होता. नागरिकांनी धडगाव पोलीस स्टेशनचे, तसेच कर्तृत्ववान कॉन्स्टेबल मनिष पावरा आणि वसावे यांचे विशेष आभार मानले. या यशामुळे नागरिकांमध्ये पोलिसांबद्दलचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दोन्ही कॉन्स्टेबलचे विशेष अभिनंदन केले असून, धडगाव पोलीस स्टेशनचे नाव जिल्ह्यात चर्चेत आले आहे.

# बोरगाव बुद्रुक येथील कुलदैवत खंडोबा मंदिर गावकऱ्यांसाठी प्रति जेजुरी वसारीधारक गोपाळ देव निंगुळे यांची माहिती



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील बोरगाव बुद्रुक येथील खंडोबा मंदिर हे नुकत्याच जवळ आलेल्या चंपाषष्ठी या सणासाठी पूर्ण सजावट करुन सज्ज झाले आहे.गोपाळ देव निंगुळे यांच्या सहकार्याने व भक्ती भावनेने बोरगाव बुद्रुक येथील खंडोबामंदिर प्रति जेजुरीचा रूपाने उदयास येत आहे.तसेच देवाची घटस्थापना व उपवास चालू झाले आहेत.व गावकऱ्यांनी खंडोबा देवाचे पारायण मंदिरामध्ये चालू केलेले आहे.यासाठी संपूर्ण समाजाचा पाठिंबा मिळत आहे.येणारा चंपाषष्ठीचा उत्सव हा मोठ्या जल्लोषात आणि आनंदी वातावरणात करण्याचे ग्रामस्थांनी ठरवले आहे. व उपवासामध्ये देवाची नियमित आरती चालू आहे तरी उपस्थित भक्तगणांनी खंडोबा देवाचे वसारी धारक गोपाळ देव निंगुळे यांनी देवाच्या आरतीचा लाभ घ्यावा व उत्सवामध्ये सहभागी व्हावे असे संपूर्ण गावातील सर्व महिला व पुरुष बालक व जेष्ठ नागरिकांना आवाहन केले आहे.

# धर्मपीठाचा आशिर्वाद परांडकर ब्रम्हमठ युसुफ वडगाव येथे राचलिंग शिवाचार्य महाराजांचा काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी घेतला आशीर्वाद

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

राजकीय आणि सामाजिक कार्यात सक्रिय असलेले काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष युसूफ वडगाव जिल्हा परिषद सर्कलचे उमेदवार तथा गंगा माऊली शुगरचे संचालक श्री.राहुल भैय्या सोनवणे यांनी गुरुवारी युसूफ वडगाव येथील परांडकर ब्रम्हमठ येथे राचलिंग शिवाचार्य महाराजांची भेट घेऊन त्यांचे दर्शन घेतले व त्यांचे आशीर्वाद घेतले. धर्मपीठाचा आशीर्वाद हा धार्मिक कार्याबद्दल आदर व्यक्त करत राहुल भैय्या सोनवणे यांनी मठावर येऊन राचलिंग शिवाचार्य महाराजांचे चरणस्पर्श करून आशीर्वाद घेतला. आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमी वर त्यांनी महाराजांकडून सदिच्छा व शुभेच्छा घेतल्या.यावेळी राचलिंग शिवाचार्य महाराज यांच्या कडून सत्कार व शुभेच्छा घेऊन आशिर्वाद घेतले. यावेळी राचलिंगशिवाचार्य महाराजांनी देखील राहुल भैय्या सोनवणे यांच्या भेटीबद्दल समाधान व्यक्त केले.महाराजांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन राहुल भैय्या सोनवणे यांचा सत्कार करण्यात आला आणि त्यांच्या पुढील वाटचालीस भरभरून शुभेच्छा देण्यात आल्या.धर्मपीठाच्या या आशीर्वादामुळे राहुल भैय्या सोनवणे यांच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते. या महत्त्वाच्या भेटीप्रसंगी राहुल भैय्या सोनवणे यांच्यासोबत शिवदास तात्या पाटील,बाळासाहेब नांदे,सुहास गुजर, नागनाथ राऊत,कोरसाळे आप्पा आदी मान्यवर उपस्थित होते.



# केज तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांचे हप्ते तात्काळ वितरीत करण्याची मागणी

## गट विकास अधिकाऱ्यास मिनाज पठाण यांचे निवेदन

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील विविध घरकुल योजनांतील लाभार्थ्यांचे प्रलंबित हप्ते तात्काळ वितरीत करण्यात यावेत,अशी मागणी अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे संचालक व सोनी जवळा ग्रामपंचायत सदस्य मिनाज पठाण यांनी केली आहे.याबाबत त्यांनी केज पंचायत समितीचे गटविकास अधिकारी नागरगोजे यांना निवेदन सादर केले. पंतप्रधान आवास योजना, इंदिरा आवास योजना, रमाई घरकुल योजना, शबरी आवास योजना आणि मोदी आवास योजना अशा विविध योजनांमधून केज तालुक्यातील गोर-गरीब लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करण्यात आले आहेत. शासनाच्या नियमानुसार या घरकुलांच्या निधीचे दोन ते तीन हप्ते संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येतात. मात्र अनेक लाभार्थींच्या घरकुलांचे बांधकाम अर्धवट अवस्थेत असून हप्ते वेळेवर न मिळाल्याने ते आर्थिक अडचणीत सापडले आहेत.हप्ता न मिळाल्यामुळे अनेक लाभार्थी वर्षानुवर्षे पंचायत समितीच्या चकरा मारत असून त्यांनामोठ्या प्रमाणावर आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.काही लाभार्थ्यांना तर दिवसभर उपाशीपोटी तालुक्याच्या ठिकाणी वाट पाहण्याची वेळ येत असल्याचे मिनाज पठाण यांनी निवेदनात नमूद केले.शासनाकडून जाणीव पूर्वक विलंब होत असल्याचे आरोप करत, सर्व घरकुल योजनांचे प्रलंबित हप्ते तात्काळ वितरीत न झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मिनाज पठाण यांनी निवेदनाद्वारे गटविकास अधिकाऱ्यांना दिला आहे.



# अनाथ आरक्षणामध्ये बदल करत राज्य सरकार आता जेथे एक जण नौकरीला लागत होता आता तेथे पाच जणांना नियुक्ती मिळणार

## श्रीराम तांदळे यांच्या प्रयत्नाला आले यश

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

राज्य शासनाने अनाथ आरक्षण जीआर मध्ये बदल केला असुन पुर्वी असलेले आरक्षण आता त्यात रिक्त जागी पण अनाथ मुलाना नियुक्त करनार आहेत याचा फायदा सर्व अनाथ मुलांना नौकरीसाठी होणार आहे.यात एक मुलगा सरकारी नोकरीला लागत होता आता तिथे पाच जण लागणार आहेत कारण जेथे जागा निघत होत्या तेथे अनाथ मुलांना जेवढी जाहिरात काढली त्याचा एक टक्के जागा वाट्याला येत होत्या परंतु आता यामध्ये राज्य सरकारने यात



जागा येणार आहेत.म्हणजे जर ५०० जागा रिक्त असतील तर आणि त्यांनी १०० जागेची भरती काढली तर पहिली एक जागा वाट्याला येत होती पण आता तिथे ५ जागा अनाथ मुलांना मिळणार आहेत म्हणजे ५०० जागा रिक्त असतील तर ५जागा अनाथ मुलांच्या वाट्याला येणार आहेत. यामुळे एक मुलगा नोकरीला लागणार होता आता तेथे पाच जण लागणार आहेत अशी माहिती मंत्रालयातील अधिकारी श्रीराम तांदळे यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे.या शासन निर्णयाचे अनाथ विद्यार्थी

# लोकनेते बाबुरावजी जोगदंड यांच्या पाठीशी युवकांची फौज उभी करू-विवेक कुचेकर

दैनिक वादळ वार्ता

**चौसाळा । प्रतिनिधी**

चौसाळा हे शहर ग्रामीण भाग असले तरी या पंचक्रोशीतील सर्व जाती, धर्म, पंथ, आणी समुदाया च्या नागरिकांसाठी दिलदार मनाचा राजा म्हणून लोकनेते डॉ. बाबुरावजी जोगदंड यांचे नाव अग्रक्रमाने प्रथम येते. या नावाला वलयं आहे तो सामाजिक कार्याचा, सामाजिक भानाचा, अडल्या नडल्याचा, दुःखीतांचा, शोषित, वंचितांचा, समाजा समाजात मानव हाच सर्वश्रेष्ठ धर्म आहे ही उदात्त भावना पेरणाऱ्या बाबुरावजी जोगदंड या लोकनेत्याचा. बाबुरावजी जोगदंड हे व्यक्तीमत्व म्हणजे चौसाळा गणातले निःस्वार्थ समाजकार्य करणारे महामेरू पर्वत आहेत. असा लोकनेता आम्हा चौसाळकर नागरिकांसाठी जिल्हा परिषद गणातुन आमच्या हक्काचा उमेदवार म्हणून मिनी मंत्रालय समजल्या

आम्हा सर्वांची लोकभावना आहे. असे मत बाबुरावजी जोगदंड यांचे खंदे समर्थक समजले जाणाऱ्या विवेक कुचेकर यांनी व्यक्त केले आहे. मागील गेल्या सतरा वर्षापासुन युवा कार्येकर्ते विवेक कुचेकर यांचा सामाजिक चळवळीत सक्रीय सहभाग असुन,दलीत आदीवासी,भटके विमुक्त, ओबीसी समाजासह प्रत्येक जाती धर्मातील युवकाची फलटण विवेक कुचेकर या तरुण निस्वार्थी कार्येकर्त्याच्या मागे उभी आहे आगामी काळात डॉ. बाबुरावजी जोगदंड यांना याचा मोठा फायदा होणार असुन आंबेडकरी चळवळीतील युवा नेतृत्व विवेक कुचेकर हे निस्वार्थी पणे डॉ.बाबुरावजी जोगदंड यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे.चौसाळा पंचक्रोशीत विवेक कुचेकर हे नाव म्हटले की सर्वसामान्य लोकांचा आवाज म्हणुन ओळखले जाते चोसाळा शहरातील व सर्कल मधील



युवाकार्यकर्त्याकडे हक्काने येवुन आपले प्रश्न मांडतो व तो प्रश्न सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न

गेल्या पधरावर्षापासुन सामाजिक क्षेत्राबरोबरच पत्रकारिता क्षेत्रात सुद्धा विवेक कुचेकर या तरुणाचा मोठा वाटा असुन सध्या तो चौसाळा पत्रकार संघाचा अध्यक्ष असुन विविध सामाजिक क्षेत्रातील पुरस्काराने त्याला सन्मानित देखील करण्यात आलेले आहे.विवेक कुचेकर सारखा युवा कार्यकर्ता डॉ. बाबुरावजी जोगदंड यांच्या पाठीशी समर्थपणे उभा असुन युवकाची मोठी फलटण उभी असल्यामुळे विरोधकाच्या गोटात खळबळ माजली आहे जि. परिषद गणातून बाबुरावजी जोगदंड यांना आम्हा चौसाळकरांचा उमेदवार म्हणून उमेदवारी दिली जावी. बाबुरावजी जोगदंड यांच्या साठी युवकांची फौज उभी करून आमच्या चौसाळकरांचे बाबुरावजी जोगदंड यांना जिल्हा परिषदेत पाठवण्याचे स्वप्न पूर्ण करू असे प्रतिपादन युवा कार्येकर्ते विवेक कुचेकर यांनी

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077